थोडक्यात महत्त्वाचे



कुंडल : विभागीय बेसबॉल स्पर्धेतील विजयी संघा बरोबर शहाजी लाड, डॉ.के.एम.नलावडे, प्रा. विश्वास सावंत व महाविद्यालयाचे खेळाडू.

# जी. डी. बापू लाड महाविद्यालय संघ बेसबॉल मध्ये प्रथम

**कुंडल :** शिवाजी विद्यापीठाअंतर्गत महिलांच्या विभागीय बेसबॉल स्पर्धमध्ये क्रांतीअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालय कुंडलच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर अंतर्गत ए.एस.सी. कॉलेज रामानंदनगर येथे पार पडलेल्या महिलांच्या सांगली जिल्हा विभागीय बेसबॉल स्पर्धेमध्ये कुंडलयेथील क्रांतीअग्रणी जी. डी बापू लाड महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून सौ. विजयाताई रमेश सिंहासने फिरता चषक पटकाविला. विजयी संघास महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.व्हि.डी.सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघातील खेळाडूंचे क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख अरुण आण्णा लाड, समन्वय समितीचे सचिव व क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जिल्हापरिषद सदस्य शरद लाड तसेच सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी अभिनंदन केले.

दै. तरुण भारत ता-08/03/2016